# नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

## 'बावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची सन २००८/२००९ या वर्षाची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. ७/८/२००९ इ. रोजी दुपारी ठिक ३.३० वाजता, **संस्थेचे प्रधान कार्यालय ५३२ ई वॉर्ड, शाहुपूरी, व्यापारी पेठ, कोल्हापूर.** येथे बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासद बंधू-भगिनींनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१. दि. ०९/०८/२००८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २००८/२००९ सालचा संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा, पत्रके स्विकारणे व नफा विभागणी मंजूर करणे.
३. सन २००८/२००९ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्चास मंजूरी देणे व सन २००९/२०१० सालाकरिता खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४. सन २००८/२००९ सालचा शासकीय लेखा परीक्षण अहवाल आलेस वाचून नोंद घेणे.
५. सन २००९/२०१० या वर्षाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीस यांची नियुक्ती करणे.
६. एक रकमी कर्ज परतफेड वेळी कर्जदार सभासदांना व्याज, दंडव्याज व इतर खर्चामध्ये दिलेल्या सूटीस मंजुरी देणे.
७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५/२ प्रमाणे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे कुटुंबियांना अहवाल सालात दिलेल्या कर्जाची नोंद घेऊन त्यास मंजुरी देणे.
८. शासनाच्या ''सहकारा अंतर्गत सहकार'' या धोरणानुसार कर्ज व ठेवी खरेदी करणे अथवा बंद पडलेली एखादी पतसंस्था अथवा तिची शाखा आपल्या संस्थेत विलीन करून घेणेबाबत विचार करणे.
९ संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मंजुरी देणे.
१०. मे. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

कोल्हापूर दि. : २५/७/२००९

श्री. अनिल आ. पाटील- चेअरमन

सूचना : सभासदांना या वार्षिक सभेपुढे येणाऱ्या विषयासंबंधी माहिती पाहिजे असल्यास ऑफिस वेळेत मिळेल. सभासदांना काही प्रश्न वा माहिती विचारावयाची असेल तर त्यांनी दि. ४/८/२००९ पर्यंत ऑफिसमध्ये कामकाजाच्या वेळेत लेखी द्यावी.

टीप : गणपूर्तीसाठी सभा तहकूब झालेस त्याचदिवशी त्याचठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यास कोरमची गरज भासणार नाही.